**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क. 666/2022 मधील नि.1 वरील आदेश</u>**
**शकुंतला व इतर विरुध्द निरंक**
**<u>CNR NO.MHBIO800-1556-2022</u>**

1. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन 1827 चे कलम 2 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

2. **<u>अर्जदारांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.</u>**

अर्जदार क. 1 ही मयताची पत्नी, अर्जदार क. 2 व 3 ही मयताची मुले आहेत. मयत त्रिंबक किसन घडसिंगे यांचा मृत्यू **दि.27.10.2016** रोजी झालेला आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अशी विनंती केली आहे.

3. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी दि. 14.10.2022 रोजी दै.माजलगाव टाईम्स (नि.क.8) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. तसेच तहसील व नगरपरिषद कार्यालय, ता.माजलगाव जि.बीड येथे देखील जाहीर प्रगटन डकविण्यात आले होते, परंतु कोणीही आजपर्यत आक्षेप नोंदविला नाही.

4. अर्जदारांतर्फे अर्जदार क. 3 अमोल त्रिंबक घडसिंगे यांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ पुराव्याचे शपथपत्र (नि.क.9), ग्रामपंचायत कार्यालय, पुनंमगाव, ता.माजलगाव यांनी दिलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क.4 सोबत, अर्जदार यांचे आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती तसेच अर्जदार यांचे पेपरमधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क.8 अशी कागदपत्रे दाखल केली आहेत, जी अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आहेत.

5. अर्जदारांच्या वारसाबद्दल कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे अर्जदार क. 1 ते 3 हे मयताचे वारस असल्याचे दिसुन येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

1) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

2) अर्जदार क्र.1 शकुंतला त्रिंबक घडसिंगे, अर्जदार क्र.2 विलास त्रिंबक घडसिंगे व अर्जदार क्र. 3 अमोल त्रिंबक घडसिंगे, सर्व रा. पुनंदगाव, ता.माजलगाव, जि.बीड हे मयत त्रिंबक किसन घडसिंगे यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येते.

3) आवश्यक ती कोर्ट फिस दिल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

RAHUL BALBHIM POL

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2023.03.03 17:20:20 +0530

दिनांक : 03.03.2023.
ठिकाण : माजलगाव.

**( आर. बी. पोळ )**
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माजलगाव.

CERTIFICATE

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Dictated on : 03.03.2023.

Transcribed on : 03.03.2023.

Checked & signed on : 03.03.2023.

Sd/-

Date: 03.03.2023. P.P.Andurkar

Stenographer Gr-3

3rd Jt. Civil Court J.D.Majalgaon.